# प्रेस नोट

अन्न व औषध प्रशासन (महाराष्ट्र राज्य) यांचे नियंत्रण कक्ष स्थापन करण्याबाबत.

सध्या जगात/देशात/राज्यात कोरोना विषाणूचा वाढत्या प्रादुर्भावामुळे भयावह स्थिती निर्माण झालेली आहे. या परिस्थितीत जनतेला सर्व आवश्यक औषधे नियमित उपलब्ध होणे अत्यंत आवश्यक आहे. औषध वितरण व उत्पादन हे अत्यावश्यक सेवेमध्ये मोडते. मात्र औषध वितरण नियमित ठेवणे व औषध उत्पादन सुरळीत सुरु ठेवणे यासाठी अडचणी निर्माण होत आहेत या अडचणींचे तत्परतेने निराकरण करण्याच्या दृष्टीकोनातून अन्न व औषध प्रशासनाच्या मुख्यालयात श्री. सुनील भारद्वाज, पोलीस अधीक्षक तथा सह आयुक्त (दक्षता), अन्न व औषध प्रशासन यांच्या नियंत्रणात नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आले आहे. तरी संबंधितांना काही अडचणी आल्यास त्यांनी कृपया नियंत्रण कक्षाशी संपर्क साधवा.

नियंत्रण कक्ष दूरध्वनी क्र. १८००२२२३६५

०२२-२६५९२३६२/६३